ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

# अर्थ

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख ४ मार्च, १९५३ | अंक ९

## विविध माहिती

**मासे पकडण्यापासून उत्पन्न**—हैद्राबाद-राज्य सरकारला मासेमारीच्या धंद्यापासून १९५१-५२ सालीं ३,५३,००० रुपयांचें उत्पन्न झालें. राज्य सरकारनें ह्या धंद्याचा विकास करण्यासाठीं आणखी तीन योजना अंमलांत आणण्यास सुरुवात केली आहे. ह्या सर्व योजनांना मिळून १·२५ लाख रुपये खर्च येणार आहे. राज्यानें ह्या धंद्यासाठीं एक स्वतंत्र खातेंच उघडलें आहे.

**लोकरीच्या धंद्याची वाढ**—उत्तर-प्रदेश सरकारनें अल्मोरा जिल्ह्यांतील लोंकरीच्या धंद्याची वाढ करणारी एक योजना तयार केली आहे. योजनेप्रमाणें लोकरी धागे विणण्याचीं सहा केंद्रें उघडण्यांत येणार आहेत. मेंढ्यांची निपज करण्याचें एक केंद्रहि सुरू करण्यांत येईल. लोकरीचें कापड करण्यास तिबेटमधून येणारी लोंकर योग्य नसल्यानें लोकरीचें अधिक उत्पादन करण्याचें ठरलें आहे.

**सायकली विकत घेण्यांत तिसरा नंबर**—गेल्या वर्षी भारतानें ब्रिटनपासून २,१९,६०० सायकली विकत घेतल्या. ब्रिटननेंहि गेल्या वर्षी सायकलींच्या निर्यातीचा उच्चांक गाठला. सुमारें २,३७,५७,००० पौंड किंमतीच्या २७,८९,००० सायकली निर्यात करण्यांत आल्या. भारतापेक्षा मलायानें आणि प. आफ्रिकेनें अधिक सायकली विकत घेतल्या. पाकिस्ताननें १,३६,९४८ सायकलींची आयात केली.

**माजी अध्यक्षांच्या आठवणी**—अमेरिकेचे माजी अध्यक्ष मि. ट्रूमन ह्यांनीं आपल्या आठवणी प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. 'लाइफ' ह्या सुप्रसिद्ध अमेरिकन नियतकालिकानें आठवणी प्रकाशित करण्याचे हक्क विकत घेतले आहेत. मि. ट्रूमन आपल्या कारकीर्दीतील महत्त्वाच्या कागदपत्रांसाठी एक वाचनालयहि बांधणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

**रखवालदारांसाठीं इनाम**—गेल्या ऑक्टोबरमध्यें पंजाब नॅशनल बँकेच्या अजमीर शाखेंत १ लाख रुपयांचा दरोडा पडला होता. दरोडेखोरांनीं बँकेच्या हिशेबनिसांवर हल्ला करून वरील रक्कम पळविली होती. सदर दरोडेखोरांना अटक करणाऱ्या पोलिसाला २,००० रुपयांचें बक्षीस भारताचे गृहमंत्री डॉ. काटजू ह्यांच्या हस्तें नुकतेंच देण्यांत आलें.

**हॉलंडला इजिप्तचा कापूस**—हॉलंड व इजिप्त ह्या दोन देशांनीं एक व्यापारी करार केला आहे. कराराच्या अटीप्रमाणें हॉलंड इजिप्तला औद्योगिक माल पुरविणार असून त्याच्या बदला कापूस विकत घेणार आहे.

**अमेरिकेंत दाखविले जाणारे चिनी चित्रपट**—अमेरिकेंत दाखविल्या जाणाऱ्या परकीय देशांच्या चित्रपटांत चीनच्या चित्रपटांचा अनुक्रम पहिला लागतो. हे सर्व चित्रपट हाँगकाँग-मधील बिगर-कम्युनिस्ट निर्मात्यांनीं तयार केलेले असतात. अमेरिकेंत चिनी चित्रपट दाखविणारीं चित्रपटगृहें सुमारें २० आहेत. त्यांतून हे बोलपट १८ महिनेपर्यंत दाखविण्यांत येतात व नंतर नष्ट करून टाकले जातात.

**ऑस्ट्रेलिअन विद्यापीठांत भारतीय प्राध्यापक**—ऑस्ट्रेलिआंतील सिडने विद्यापीठानें डॉ. हरि नारायण ह्या भारतीय प्राध्यापकाची नेमणूक आपल्या प्राध्यापक-वर्गांत केली आहे. डॉ. हरि नारायण हे १९५० सालीं युनेस्कोची फेलोशिप मिळवून ऑस्ट्रेलिआंत गेले होते. त्यांनीं केलेल्या कामगिरीवर खूष होऊन विद्यापीठानें त्यांना परत बोलाविलें आहे. जिओफिजिक्स हा विषय ते शिकवितात.

**चार्ली चॅपलीनचें घर विकाऊ**—सुप्रसिद्ध सिने नट चार्ली चॅपलीन ह्यांचे हॉलिवुडमधील घर विकाऊ आहे, असें समजतें. त्याची किंमत १॥ लाख डॉलर्स लावण्यांत आली आहे. घरांतील लांकडी सामान हलविण्यांत आलें आहे.

**जमीनदारीच्या नाशाचा परिणाम**—गेल्या फडणिशी वर्षांत बिहारच्या सरकारला शेतीवरील उत्पन्नाच्या कराच्या रूपानें ५७ लाख रुपयांचें उत्पन्न झालें होतें. चालू फडणिशी वर्षांत तें २५ लाख रुपयांच्यावर जाणार नाहीं असें समजतें. बिहारमधील जमिनदारी कायद्यानें नष्ट करण्यांत आल्यामुळें जमीनदारवर्ग कर भरण्याचें टाळीत असावा, असा अंदाज केला जात आहे.

**सीलोनचे आयातीवर निर्बंध**—गेल्या नोव्हेंबरमध्यें लंडनला भरविल्या गेलेल्या कॉमनवेल्थ आर्थिक परिषदेसंबंधी विचारल्या गेलेल्या प्रश्नाला सीलोनच्या प्रतिनिधी-सभागृहांत उत्तर देतांना पंतप्रधान श्री. सेनानायके म्हणाले कीं, सीलोनला पडलेल्या डॉलर्सचा तुटवडा भरून काढण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे अमेरिकेला अधिक माल विकणें आणि अमेरिकेकडून कमी माल घेणें.

**अमेरिकन गव्हाच्या विक्रींत तोटा**—भारताला मिळालेल्या १९ कोटी डॉलर्सच्या कर्जातून अमेरिकेकडून गहूं विकत घेण्यांत आला होता. ह्या गव्हाची विक्री केल्यावर सरकारला १६,७६,९१,००० रुपये तोटा झाल्याचें आढळून आलें. देशांत गहूं विकून ७३,५०,००,००० रुपये किंमत आली. ही रक्कम एका फंडांत ठेवण्यांत आली असून तीमधून राज्य-सरकारांना अल्प व मध्यम मुदतीचीं कर्जें देण्यांत येतात.

## "अर्था"ची उपयुक्तता

श्री. संपादक अर्थ यांसः– सा. न. वि. वि.

आपल्या साप्ताहिकास १८ वर्षे पूर्ण होऊन १९ व्या वर्षांत पदार्पण करण्यास मिळालें ही अखिल महाराष्ट्रीय जनतेस मोठी अभिमानाची गोष्ट आहे. अर्थशास्त्रासारख्या गंभीर विषयावर इतक्या वर्षे साप्ताहिक चालविणें ही गोष्ट आपल्या चातुर्याची व बुद्धिमत्तेची निदर्शक आहे. सुरुवातीपासून आपल्या साप्ताहिकाचा वाचक होण्याची मला संधि मिळाली व त्यामुळें त्या शास्त्र-विषयक गोष्टींचें नवें ज्ञान मला झालें. आपल्या साप्ताहिकांतील अनेक मजकुराचीं कात्रणें मला उपयोगी पडलीं आहेत व तशीच तीं इतरांनाहि पडलीं असतील. आपले 'विविध माहिती' चें सदर हें वैशिष्ट्यपूर्ण व परिश्रमपूर्वक तयार केलेलें असतें व तें जसेंच्या तसें 'सह्याद्रि' मासिकांत उल्लेखपूर्वक उद्धृत केलें जात होतें, यांतच त्याचें महत्त्व आहे. आपल्या साप्ताहिकास भरभराट लाभून त्याची उपयुक्तता महाराष्ट्रीय जनतेस लाभो, एवढी प्रार्थना करून हें पत्र संपवितों.

आपला

७२०, सदाशिव, पुणें
२२-२-१९५३

श्री. वि. गाडगीळ
एम्. ए., एलूएल्. बी.

### सहकारी सेक्रेटरी शिक्षण-वर्ग

द. सातारा जिल्हा को. ऑ. बोर्डाचे विद्यमानें सांगली येथें श्री. गणपतराव आरवाडे हायस्कूलमध्यें ता. २०।२।१९५३ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां मे. रा. द. रेठरेकर, बी. ए., एलूएल्. बी. वकील, जिल्हा ऑनररी ऑर्गनायझर को. ऑ. सोसायटीज व सहकारी कार्यकर्ते यांचे अध्यक्षतेखालीं सहकारी सेक्रेटरी शिक्षण-वर्गाचा उद्घाटन-समारंभ साजरा झाला. अध्यक्षांनीं आपले भाषणांत सहकार म्हणजे काय व सहकारी कार्यकर्त्यांचीं कर्तव्यें समजावून सांगून, हल्ली या चळवळींतहि बराच स्वार्थ बोकाळला आहे, तरी तुम्ही तरुण पिढी या स्वार्थापासून दूर राहून "सहकारी संघराज्य" हें आपल्या सरकारचें ध्येय साध्य करा, अशी खात्री व्यक्त केली

### श्री. जमखंडीमठ

इस्रायलमधील सहकारी शेतीचा अभ्यास करण्यासाठी असिस्टंट रजिस्ट्रार श्री. सी. एस. जमखंडीमठ यांना भारत सरकारनें स्कॉलरशिप दिली आहे. श्री. जमखंडीमठ हे २७ फेब्रुवारी रोजीं पॅलेस्टाइनला जाण्यासाठीं निघाले. विजापूर आणि धारवाड जिल्ह्यांत त्यांनीं बरीच कामगिरी केलेली आहे.

### रस्त्यांवरील अपघातांतील मृत्यू व दुखापती

ग्रेट ब्रिटनमध्यें रस्त्यांवरील अपघातांत १९५२ मध्यें ४,७०५ लोक दगावले व ५०,३७१ लोकांना जबर दुखापती झाल्या. १९२६ मध्यें या अपघातांचे आंकडे गोळा करण्यास प्रारंभ केला, त्यानंतर कोणत्याहि वर्षी इतके कमी मृत्यू झाले नव्हते. पेट्रोलचें रेशनिंग युद्धकाळांत व त्यानंतर अंमलांत होतें., तेव्हां मात्र अपघातांची संख्या ज्यास्त होती.

### राणीच्या राज्यारोहणास हिंदी जादूगारास निमंत्रण

ग्रेट ब्रिटनच्या राणी एलिझाबेथच्या राज्यारोहणसमारंभासाठीं गोगिया पाशा या हिंदी जादूगारास निमंत्रण आलें आहे. पूर्वेकडील दुसऱ्या कोणत्याहि जादूगारास हा मान मिळालेला नाहीं, असें त्याचें म्हणणें आहे.

डॅनिश वाचनालयांत गांधींचीं पत्रें—कोपनहेगन येथील डॅनिश रॉयल लायब्ररी या संस्थेला महात्मा गांधींचीं १२० पत्रे असलेला एक संग्रह नजर म्हणून देण्यांत आला आहे. एक भारतीय शस्त्रवैद्याच्या डॅनिश पत्नीला महात्माजींनीं लिहिलेलीं हीं पत्रें आहेत. या बाईचें नांव मिसेस ईस्टर मेनन असें असून त्या भारतांत १९१६ साली मिशनरी म्हणून काम करीत होत्या. पत्रांचा आरंभ 'माय डिअर चाइल्ड' असा आहे व सही 'बापू' अशी आहे.

अमेरिकन बँकेच्या पाकिस्तानांत शाखा—अमेरिकेंतील चेस नॅशनल बँक ही संस्था पाकिस्तानभर आपल्या शाखा काढणार असल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे. या बाबतींत पाकिस्तान सरकारशीं गेले कांहीं महिने वाटाघाटी सुरू होत्या. त्यांची फलनिष्पत्ति म्हणून बँकेला ८ शाखा काढण्याची परवानगी मिळाली आहे, असें समजतें. सध्या पाकिस्तानांत एकहि अमेरिकन बँक नाहीं.


## NOTICE

**THE BELGAUM BANK LIMITED, BELGAUM**

Notice is hereby given that the Annual General Meeting of the Share Holders of the Bank will be held on Tuesday the 24th March 1953 at the **Bank's New Building at Rawiwar Peth,** Belgaum, at 1 p. m. to transact the following business :—

(1) To receive and adopt the report of the Directors and the audited Statement of accounts for the year ended 31st December 1952.
(2) To Declare a Dividend.
(3) To fill up the vacancies caused by the retirement of three of your Directors Viz.
1. Shri. M. G. Herekar
2. „ G. L. Gajendragadkar
3. „ B. B. Potdar
The retiring Directors are eligible for re-election & they offer themselves for re-election.
(4) To appoint Auditors and to fix their remuneration.
(5) To do such other work as may be placed before the meeting with the permission of or by the Chairman.

Belgaum :
14th Feb. 1953.

By Order of the Board.
Sd/—M. G. Herekar
CHAIRMAN.

**Share Holders desiring to ask any question at the General Meeting are requested to send them to the Chairman, before the 14th March 1953 for convenience.**

**The Transfer Books of The Company will be closed from 5th March 1953 to 24th March 1953 both days inclusive.**

**The Dividend when sanctioned will be paid on or after 30th March 1953. The Share Holders are requested to communicate their change of address if any.**

# अर्थ

बुधवार, ता. ४ मार्च, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## राजस्थानमधील बँकांचें एकीकरण

गेल्या महिन्याच्या २५ व २६ तारखेस राजस्थानमधील तीन बँकांचें एकीकरण करण्याच्या वाटाघाटी करण्यासाठी एक बैठक रिझर्व्ह बँकेनें मुंबई येथें भरविली होती. बैठकीसाठी राजस्थानमधील बँक ऑफ बिकानेर, बँक ऑफ जयपूर आणि बँक ऑफ राजस्थान ह्या तिन्ही बँकांच्या प्रतिनिधींना पाचारण करण्यांत आलें होतें. वरील तिन्ही बँकांचें एकीकरण करण्याचा प्रश्न राजस्थान सरकार आणि बँका ह्यांच्यासमोर आज बराच काळ आहे. राजस्थानमधील संस्थानांचें विलीनीकरण झाल्यानंतर राजस्थान राज्य सरकारपुढें एक नवाच प्रश्न उपस्थित झाला. आपल्या प्रदेशांतील पैसे गोळा करणें आणि लागतील त्याप्रमाणें ठिकठिकाणीं पाठविणें ह्यासंबंधीं एखादी एकसूत्री आणि सोयीस्कर पद्धत अंमलांत आणणें त्याला आवश्यक वाटूं लागलें. उपरिनिर्दिष्ट तिन्ही बँका आपआपल्या भागांत सरकारचे खजिनदार ह्या नात्यानें कामें करीत होत्या. परंतु तिन्ही संस्थानांनीं आपआपल्या अखत्यारांतील बँकांना ज्या अटींवर व सवलतींवर काम करण्याची परवानगी दिली होती त्यांच्यांत फारच फरक होता. ही अडचण लक्षांत घेऊन राज्य सरकारनें तिन्ही बँकांना एक परिपत्रक पाठविलें होतें. त्यांत असें म्हटलें होतें कीं, राज्यांतील बँकिंगचे व्यवहार सुस्थिर पायावर उभारणें आणि त्या व्यवसायाचा निरोगी विकास साधणें ह्या गोष्टीवर राज्याची आर्थिक प्रगति बऱ्याच प्रमाणावर अवलंबून आहे. इंपीरिअल बँक ऑफ इंडिया ह्या बँकेला सरकारतर्फेचे द्रव्यविषयक व्यवहार करण्यासाठी ज्या अटी व सवलती देण्यांत आल्या आहेत, त्याच अटी व सवलती युनायटेड बँक ऑफ राजस्थान ह्या नव्या संकल्पित बँकेला देण्याची रिझर्व्ह बँकेनें तयारी दाखविली आहे, असें समजतें.

ह्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी बँक ऑफ जयपूरच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची बैठक नुकतीच भरविण्यांत आली होती. ही बँक आणि बँक ऑफ राजस्थान ह्या दोन्ही संस्थांनीं संकल्पित एकीकरणाच्या योजनेला आपली अनुमति दर्शविली आहे, असें कळतें. बँक ऑफ बिकानेरनें मात्र अद्याप आपला निर्णय ठरविलेला नाहीं. कांहीं कांहीं बाबतींत बँकांनीं आपले आक्षेपहि सांगितले आहेत. नव्या बँकेच्या जनरल मॅनेजरची नेमणूक, राज्य सरकारचा नकाराधिकार आणि सरकारतर्फे बोर्डावर नेमण्यांत येणारे तीन डायरेक्टर ह्या बाबींसंबंधीं वरील आक्षेप आहेत असें म्हणतात. परंतु त्या आक्षेपांतून मार्ग न निघण्यासारखे ते आहेत असें नाहीं. संकल्पित एकीकरण झालें तर सर्वसामान्य खर्चांत बरीच कपात करतां येईल, कारभारविषयक खर्चांत काटकसर करतां येईल आणि फाजील व अयोग्य स्पर्धेमुळें होणारें नुकसान कमी होईल. तथापि, ह्या योजनेला दुसरीहि एक बाजू आहे आणि ती थोडीशी दुःखदायक आहे. एकीकरण होऊन नवी बँक अस्तित्वांत आल्यावर तिन्ही बँकांच्या बऱ्याच शाखा बंद करण्यांत येतील हें क्रमप्राप्तच आहे. अर्थात् ह्या शाखांतून काम करणाऱ्या नौकरांना बेकार व्हावें लागेल, अशी भीति व्यक्त करण्यांत येत आहे. असें असलें तरी परिस्थिति इतकी कांहीं वाईट नाहीं. कारण, वरील तिन्ही बँकांच्या सर्वच खेडेगांवीं शाखा आहेत असें नाहीं. तेव्हां शाखा बंद करण्यामुळें बेकारी एकदम वाढेल असा संभव कमी आहे. शिवाय दुसरें असें कीं राजस्थानांतील ग्रामीण विभागांत अजून पुष्कळ ठिकाणीं बँकांमार्फत व्यवहार करण्याची सोय उपलब्ध नाहीं. अशा नव्या विभागांत संयुक्त बँकेच्या शाखा काढूनहि जुन्या नोकरांपैकी कांहींची सोय लावतां येण्यासारखी आहे. महाराष्ट्रांतील बँकांच्या एकीकरणाची चर्चा 'अर्था'च्या दिवाळी अंकानें चालू केली. त्यांत अनेक अनुभवी तज्ज्ञांनीं भाग घेतला व मतप्रदर्शन केलें. बंगालमधील कांहीं बँकांचें एकीकरण मार्गे झालेलें आहे. इतर ठिकाणीं चाललेल्या ह्या घडामोडींकडे महाराष्ट्रीय बँकांचें लक्ष राहील, हें स्वाभाविकच आहे.

## राज्यसरकारांस कर्जे

१९५२–५३ च्या हिशेबी कर्जात, ३१ जानेवारी १९५३ पर्यंत, मध्यवर्ती सरकारनें ३९·५५ कोटी रुपयांचीं कर्जें मंजूर केलीं:—

| | कोटी रु. |
|---|---|
| धरणयोजना | १९·४४ |
| अधिक धान्य पिकवा मोहीम | ११·४४ |
| औद्योगिक घरबांधणी | ०·७८ |
| विकासाच्या इतर योजना | ७·८९ |

### कर्जांची राज्यवार वाटणी

| | लक्ष रु. | | लक्ष रु. |
|---|---|---|---|
| आसाम | १०·१९ | बिहार | २७२·६५ |
| मुंबई | १४५·३० | मध्यप्रदेश | १६६·४२ |
| मद्रास | ८१०·११ | ओरिसा | ३९८·३० |
| पंजाब | ७७१·०५ | उत्तर प्रदेश | २९९·१९ |
| प. बंगाल | ६७५·९४ | हैद्राबाद | १३१·२५ |
| मध्य–भारत | ५६·६१ | म्हैसूर | ९०·२० |
| पेप्सू | ४२·०२ | राजस्थान | ५३·९२ |
| सौराष्ट्र | १४·२३ | त्रावणकोर-कोचीन | ८·३० |
| जम्मू–काश्मीर | ५५·०० | | |

## भारतांत गुंतलेलें परकीय भांडवल

१९४८ पासून गुंतविलेल्या परकीय भांडवलाची एकूण रक्कम सुमारें ८०३ कोटी रुपये आहे. त्यांत (अ) मालाच्या स्वरूपांतील परकीय भांडवल आणि (ब) प्रचलित गुंतवणुकीवर मिळालेला व पुन्हां गुंतविलेला नफा, ह्या बाबींचा समावेश नाहीं. देशनिहाय आंकडे पुढीलप्रमाणें आहेतः—

| देश | भांडवल |
|---|---|
| इंग्लंड | ६·७४ कोटी रुपये |
| अमेरिका | ७·८७ लक्ष " |
| कानडा | १६·६० लक्ष " |
| स्वित्झर्लंड | ४६·६५ लक्ष " |
| इतर देश | ५८·१२ लक्ष " |

## राज्यांना आर्थिक साह्य कां केलें पाहिजे ?

### अर्थमंडळानें केलेलें विवेचन व शिफारसी

(अ) राज्यांच्या उत्पन्नाच्या साधनांतील कमतरता, (आ) कल्याण सातीं व विकास योजना वाढविण्याचें महत्त्व, (इ) बेकारी घालविण्याच्या योजना, विमा, सामाजिक सुरक्षितता इत्यादि कार्यें व इतर गोष्टी यांची वाढ करण्यासाठीं राज्यांना मदतीची आवश्यकता आहे. झपाट्यानें बदलत असलेल्या आर्थिक परिस्थितीच्या दृढपणामुळें नवीन सरकारी खात्यांसाठीं सतत आणि मोठ्या मागण्या पुढें येत असताचे वेळीं राज्यांच्या साधनांत पडलेला तुटवडा लक्षांत घेऊन त्यांना आर्थिक साह्य केलें पाहिजे.

### सशर्त व बिनशर्त साह्य

बिनशर्त साह्यामुळें राज्यसरकारांच्या सर्वसाधारण उत्पन्नांत भर पडेल, व त्यांना आपल्या योग्य निर्णयानुसार अशा रकमेचा योग्य प्रकारें चांगल्या कामांसाठीं उपयोग करतां येईल. सशर्त मिळणारें आर्थिक साह्य कांहीं विशिष्ट कामाच्या विकासासाठीं द्यावें, असें मत मंडळानें व्यक्त केलें आहे.

### आर्थिक साह्य देण्याचीं तत्त्वें

राज्याच्या स्वावलंबीपणाचा प्रयत्न हीच आर्थिक साह्य देण्याची कसोटी ठरवावी. त्यावरच राज्याची साह्य मिळण्याची पात्रता व मध्यवर्ती सरकारकडून मिळावयाची रकम अवलंबून ठेवावी. राज्यांचे अर्थसंकल्प सांवरण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारनें घेतली आहे असें वाटणार नाहीं, अशा बेतानें आर्थिक साह्यांत वाढ करण्याची पद्धति स्वीकारावी. राज्यानें केलेली खर्चांतील बचत ही त्याबाबतची आणखी एक कसोटी असावी अशी मंडळानें शिफारस केली आहे.

### आर्थिक साह्याच्या इतर कसोट्या

यासेरीज पुढील बाबतींत आर्थिक साह्याची शिफारस मंडळानें केली आहे:—

(अ) मूलभूत सामाजिक व्यवस्थांच्या दर्जांत सारखेपणा आणण्यास, (आ) राज्याच्या कक्षेंतील एकादी बाब राष्ट्रीय महत्त्वाची असल्यास अशी खास जबाबदारी पार पाडण्यास, (इ) राष्ट्रहिताच्या दृष्टीनें मागासलेल्या राज्यांस मदत द्यावी लागणारीं प्राथमिक महत्त्वाचीं कल्याण कामें पार पाडण्यासाठीं.

### निरनिराळ्या राज्यांस किती मदत ?

राज्याची आर्थिक परिस्थिति आणि आपल्या शिफारशींमुळें त्याच्या उत्पन्नाचे साधनांत किती वाढ होईल तें लक्षांत घेऊन मंडळानें राज्या-राज्यांस सर्वसाधारण आर्थिक साह्याची शिफारस केली आहे. मद्रास, उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, हैद्राबाद, राजस्थान, मध्यभारत व पेप्सू या राज्यांस आणखी मदतीची आवश्यकता नसल्याचें मंडळाचें मत आहे. मुंबई, पश्चिम बंगाल, ओरिसा व सौराष्ट्र या राज्यांस 'कांहीं प्रमाणांत' तर पंजाब व आसाम या राज्यांस निश्चितपणें मदतीची आवश्यकता आहे. म्हैसूर व त्रावणकोर-कोचीन राज्यांची प्रगति कायम राहावी याच हेतूनें मुख्यतः त्यांस मदत करण्याची मंडळानें शिफारस केली आहे.

'कांहीं प्रमाणांत' मदत सुचविलेल्या राज्यांपैकी, मुंबई राज्याची सुविकसित आर्थिक घडी, त्याच्या अर्थसंकल्पाची व्याप्ति व साधनें यांचा विचार करतां त्यास जादा मदतीची आवश्यकता नाहीं अशी मंडळानें शिफारस केली आहे. तंबाखूवर कर लादण्याचा सध्याचा निर्बंध मागें घेण्याच्या सूचनेमुळेंहि त्या राज्यास त्यापासून जादा उत्पन्न मिळवितां येईल.

मंडळानें पश्चिम बंगालला ८० लाख रुपये, ओरिसाला ४० लाख रुपयांऐवजीं ७५ लाख रुपये, सौराष्ट्रास ४० लाख रुपये, पंजाबला १·२५ कोटी रुपये, आसामला सध्यांच्या ३० लाखांऐवजीं १ कोटी रुपये, म्हैसूरला ४० लाख व त्रावणकोर-कोचीनला ४५ लाख रुपये आर्थिक साह्य देण्याची शिफारस केली आहे, यांतील सौराष्ट्र, म्हैसूर व त्रावणकोर-कोचीन राज्यांस या प्रमाणांत वाढविलेल्या मदतीपासून फायदा होत नसून त्यांच्या उत्पन्नांतील तूट त्यांच्या वांट्यापेक्षां अधिक असण्याची शक्यता आहे. पश्चिम बंगाल व पंजाब राज्यांतील स्थलांतरितांस साह्य व पुनर्वसाहत यांवर होणारा सर्व सध्याप्रमाणेंच मध्यवर्ती सरकार करीत राहील असें मंडळानें गृहीत धरलें असून याबाबतींत राज्यांवर आणखी भार पडणार नाहीं.

### प्राथमिक शिक्षणांत मागें असलेल्यांना खास मदत

सध्यां इतर राज्यांचे मानानें प्राथमिक शिक्षणाचे क्षेत्रांत मागासलेल्या राज्यांसाठीं खास मदत देण्याची शिफारस करून मंडळानें सर्व राज्यांना मिळणाऱ्या सर्वसाधारण मदतींत नवीन प्रघात पाडला आहे. त्यानुसार, बिहार, मध्य-प्रदेश, हैद्राबाद, राजस्थान, ओरिसा, पंजाब, मध्य भारत व पेप्सू या राज्यांना १९५३–५४ ते १९५६–५७ पर्यंत वाढत्या प्रमाणांत किती मदत द्यावी त्याची शिफारस मंडळानें केली आहे.

### शिफारशींचा होणारा परिणाम

'अ' विभागीय राज्यांना १९५१–५२ ला संपलेल्या तीन वर्षांत आणि 'ब' विभागीय राज्यांना १९५१–५२ ला संपलेल्या २ वर्षांत मिळालेल्या रकमांसकट अर्थमंडळानें केलेल्या सर्व शिफारशींनुसार प्रतिवर्षी राज्यांना किती रकम मिळूं शकेल हें पुढील पत्रकांत दिलें आहे:—

| राज्य | १९५१-५२ ला संपलेल्या तीन वर्षांतील सरासरी रकम | मंडळाच्या योजनेखालील सरासरी रकम |
|---|---|---|
| आसाम | २·२१ कोटी | ३·४५ कोटी |
| बिहार | ६·५५ " | ८·५५ " |
| मुंबई | ११·६० " | ११·२५ " |
| हैद्राबाद | १·२५ " | ३·५९ " |
| मध्यभारत | ६ लक्ष | १·४६ " |
| मध्यप्रदेश | ३·२५ कोटी | ४·२० " |
| मद्रास | ८·५६ " | ११·१० " |
| म्हैसूर | ३·४५ " | १·६८ " |
| ओरिसा | २·०१ " | ३·७४ " |
| पेप्सू | १६ लक्ष | ६५ लक्ष |
| पंजाब | ३·४३ कोटी | ३·८२ कोटी |
| राजस्थान | १० लक्ष | २·८९ " |
| सौराष्ट्र | २·७५ कोटी | ३·०२ " |
| त्रावणकोर-कोचीन | ३·२९ " | ३·२१ " |
| उत्तरप्रदेश | ८·८८ " | ११·७० " |
| प. बंगाल | ७·५४ " | ९·६० " |
| एकूण बेरीज | ६५·१२ कोटी | ८५·९३ कोटी |

महसुलाच्या वांटणीच्या प्रत्यक्ष रकमा अर्थातच वर्षामणिक वेगळ्या असतील. वरील रकमा या अर्थमंडळाच्या शिफारशीनुसार मिळावयाच्या रकमेच्या केवळ निदर्शक आहेत. या शिफारशी अंमलांत आणल्यास त्या ३१ मार्च, १९५७ रोजीं संपणाऱ्या पांच वर्षांसाठीं चालतील असें मंडळानें गृहित धरलें आहे.

अर्थमंडळाच्या योजनेखालीं मिळणाऱ्या उत्पन्नांतील वांट्याचे जोडीस राज्यांना एप्रिल १९५२ पूर्वीच्या मुदतींतील त्यांच्या प्राप्तीकराच्या वांट्याची थकलेली रकमहि मिळेल.

## पंचवार्षिक योजनेस परदेशी आर्थिक व तांत्रिक साह्य

### (२)

### तांत्रिक साह्य

कोलंबो योजनेच्या तांत्रिक सहकार्ययोजनेनुसार तज्ञांचा पुरवठा व भारतीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या सोई या स्वरूपांत भारतास साह्य मिळालें आहे. आतांपर्यंत आलेल्या तज्ञांची संख्या ३६ असून आणि शिक्षणासाठी सवलती मिळालेल्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या २३५ आहे. शेतकी, दळणवळण, पाटबंधारे व वीज, खनिज द्रव्यें, शास्त्रीय संशोधन, आरोग्य, कामगार, शिक्षण, उद्योगधंदे, रेल्वे आणि मुद्रणकला वगैरे क्षेत्रांतील तज्ञ व शैक्षणिक सोई उपलब्ध झाल्या आहेत. त्याचप्रमाणें, खास प्रकारच्या यंत्रसामुग्रीच्या पुरवठ्याचे स्वरूपांतहि तांत्रिक साह्य मिळालें आहे. अखिल भारतीय स्वरूपाच्या चार संस्थांना यंत्रसामुग्री पुरविण्याकरतां ऑस्ट्रेलियन सरकारनें ६५,००० पौंड देण्याचें मान्य केलें असून, खरगपूर येथील भारतीय तंत्रविद्या संस्थेच्या कारखान्यास ३५,००० पौंड किंमतीची यंत्रसामुग्री ब्रिटिश सरकार पुरवीत आहे.

### भारताचा वांटा

कोलंबो योजनेंतील एक सभासद-राष्ट्र या नात्यानें आपली जबाबदारी पार पाडतांना भारतानेंहि दक्षिण आणि आग्नेय आशियांतील कांहीं सभासद-राष्ट्रांतील विद्यार्थ्यांस शिक्षणाच्या सोई करून देऊन ही मदत करण्यांत आली. परदेशांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांची व्यवस्था करण्यासाठी मध्यवर्ती भातसंशोधन केंद्रावर एक वसतिगृह बांधण्यासाठी खास निधी राखून ठेवण्यांत आला आहे. कॉस्टिक सोड्याचा कारखाना उभारण्यासाठी एक, पोलाद कारखान्यासाठी एक व पाटबंधाऱ्यासाठी एक असे तीन तज्ञ सीलोन सरकारला पुरविण्यांत आले होते. तज्ञ पुरविण्याच्या इतर विनंत्यांवर विचारविनिमय होत आहे.

मुख्यतः आंकडेवारी, साखर-उत्पादन, ध्वनिक्षेपण, दूरसंदेशव्यवहार, धरणबांधणी या विषयांवरील शिक्षणाच्या सोई करून देण्यांत आल्या होत्या. या देशांत पुढील देशांतील विद्यार्थ्यांना या सोई मिळाल्या. सीलोन (१४), ब्रह्मदेश (४), इंडोनेशिया (२), मलाया (१), नेपाळ (१७), पाकिस्तान (१४), फिलिपाईन बेटें (८) व थायलंड (६).

त्याशिवाय भारतानें गेल्या वर्षी सर्व देशांस ५५ शिष्यवृत्त्या व पाठ्यवेतनें देऊं केली होतीं, त्यांतील २० जागांचा आतांपर्यंत स्वीकार झाला आहे. निरनिराळ्या सरकारांनीं यासाठी केलेल्या विनंत्यांवर सध्यां विचार चालू आहे. १९५३-५४ मध्येंहि भारतानें अशा शिष्यवृत्त्या व पाठ्यवेतनें देण्याचें ठरविलें आहे.

### फोर्डफाउंडेशनकडून साह्य

भारत सरकारशीं १९ जानेवारी १९५२ रोजीं झालेल्या करारानुसार अमेरिकेंतील फोर्डफाउंडेशननें भारतास तांत्रिक साह्य देऊं केलें आहे. या कराराखाली या संस्थेकडून मिळणाऱ्या साह्याच्या सुरवातीचा कार्यक्रम म्हणजे पंचवार्षिक योजनेंतील ग्रामीण विकासकार्यक्रमाचें एक अंग राहील.

फोर्डफाउंडेशननें प्रायोगिक शेतकी विस्ताराच्या १५ योजना आणि त्यासाठी लागणाऱ्या नोकरवर्गासाठी ५ शिक्षणकेंद्रें यांच्या स्थापनेबाबत भारत सरकार व राज्यसरकारें यांस साह्य करण्याचें मान्य केलें आहे. सध्यां फाउंडेशनकडून या कार्यासाठी अंदाजें १२,००,००० डॉलर्सचें साह्य मिळण्याची अपेक्षा आहे. कांहीं थोड्या उच्च संस्थांतील विस्तार शिक्षणाच्या कार्यक्रमासाठीं आणि ग्रामीण विकासाचें कार्य चांगल्या प्रकारें करूं शकणाऱ्या कांहीं लायक इसमांना अमेरिका व इतर देशांत शिक्षणासाठी पाठविण्याकरतां आर्थिक साह्य देण्याचा विचार करण्याचें फोर्डफाउंडेशननें पुढील गोष्टींस मान्यता दिली आहे.

(१) ग्रामीण कार्यकर्त्यांच्या ५ शिक्षणकेंद्रांचा पहिल्या तीन वर्षांचा सर्व खर्च करण्याचें आणि त्याबाबत आलेला अनुभव लक्षांत घेऊन पुढील २ ते ४ वर्षांचा खर्च करावा किंवा कसें याचा विचार करणें.

(२) १५ विकासयोजनांचा पहिल्या दोन वर्षांचा एकूण खर्च करण्याचें आणि तिसऱ्या वर्षांच्या खर्चाचा एकतृतीयांश खर्च देण्याचें.

वरील विकासयोजनांच्या तिसऱ्या वर्षांतील उरलेला दोन तृतीयांश खर्च आणि चौथ्या व पांचव्या वर्षांचा सर्व खर्च निम्मे निम्म या प्रमाणांत भारत सरकार व राज्यसरकारें सोसणार आहेत.

भारत सरकार व फोर्डफाउंडेशन यांचे दरम्यान अलिकडेच झालेल्या दुसऱ्या एका करारानुसार विशेषतः समाज विकासयोजनांच्या कार्यक्रमाचें मूल्यमापन करण्यासाठी एक कार्यक्रम मूल्यमापन यंत्रणा स्थापन करण्यासाठी, फाउंडेशनकडून भारतास सुमारें २,३०,००० डॉलर मिळाले आहेत. (समाप्त)

---

**उत्तर-प्रदेशांत प्रसूतिगृहाची सोय**—उत्तर-प्रदेशांतील ग्रामीण विभागांत ६६ प्रसूतिकेंद्रें उघडण्याचें राज्य-सरकारनें ठरविलें आहे. सर्व केंद्रांना मिळून ३२ हजार रुपये खर्च येईल. खर्चापैकीं कांहीं भाग राज्य-सरकार देणार असून कांहीं भाग जागतिक आरोग्य-संघटनेकडून मिळणार आहे असें समजतें.

**भारतासाठी छोटी मोटारगाडी**—कॉव्हेन्ट्री येथील स्टँडर्ड मोटार कंपनी भारतांत व युरोपांत वापरण्यासाठीं एक छोटी मोटारगाडी मुद्दाम बनवणार असल्याचें समजतें. ह्या गाडीची किंमत १,५०० डॉलर्स अगर ५४० पौंड ठेवण्यांत येईल. ही कंपनी मोटारीसाठी जेट इंजिन वापरतां येईल कीं नाहीं ह्याविषयीं सध्यां प्रयोग करीत आहे.

**रशिआ-फिनलंड व्यापारी करार**—रशिआ व फिनलंड ह्यांनीं १९५३ सालाकरितां एका व्यापारी करारावर सह्या केल्या. फिनलंड रशिआला कागद व कागदाच्या वस्तू पुरविणार असून त्याच्या बदला धान्य, गवत, साखर, मोटारी व यंत्रसामुग्री विकत घेणार आहे.

**हैदराबाद राज्यांतील विक्रीकर**—चालू फडणिशी वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत हैदराबाद राज्यांतील विक्रीकराचें उत्पन्न अपेक्षेपेक्षा बरेंच कमी आल्याचें समजतें. सर्व वर्षांत सुमारें ३ कोटी रुपये विक्रीकर गोळा होईल असा अंदाज होता. पण पहिल्या सहा महिन्यांत जेमतेम १ कोटी रुपयेच वसूल झाले. व्यापारांतील मंदीचा हा परिणाम असावा, असें म्हणतात.

**भारतासाठी ब्रिटिश यान्या**—कलकत्त्याच्या एका कंपनीनें गोद्यांत वापरण्यांत येणाऱ्या विजेच्या यान्यांसाठीं एका ब्रिटिश कंपनीकडे मागणी नोंदविली आहे असें समजतें. ही मागणी २३ टनांचें वजन उचलणाऱ्या यान्यांची आहे. मुंबईसाठींहि ६ टनांच्या ७ यान्या मागविण्यांत आल्या आहेत.

**वाईटांतील चांगलें**—इंग्लंडच्या पूर्व किनाऱ्यावर नुकत्याच झालेल्या वादळांत ज्यांच्या कृत्रिम कवळ्या व चष्मे हरवले त्यांना ते विनामूल्य पुन्हा पुरविण्यांत येणार असल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे.

### कोणाजवळ किती सोनें आहे?

१९५२ सालांत सोन्याच्या हालचालींचे मुख्यतः तीन प्रवाह दिसून येतात. जगांत माहीत असलेल्या एकूण सोन्याच्या सांठ्याची किंमत सुमारें ३६,००,००,००,००० डॉलर्स असून त्यापैकीं अंदाजें २/३ किंमतीचें सुवर्ण अमेरिकेजवळ आहे. १९५२ सालींहि सोन्याचा ओघ अमेरिकेकडेच वहात होता; पण पूर्वीच्या मानानें तो जरा कमी होता इतकेंच. बेल्जम, कॅनडा व स्वीडन ह्या देशांनींहि आपल्या सुवर्णाच्या संठ्यांत भर घातली. ब्रिटनमध्यें मात्र सोन्याचा सांठा कमी झाला आहे असें समजतें. जगांतील प्रमुख देशांत १९५२ सालीं असलेला सोन्याचा सांठा पुढें दिला आहे. दिलेले आंकडे रशिया सोडून असलेल्या सोन्याचे आहेत.

सोन्याचा सांठा
(आंकडे दशलक्ष डॉलर्सचे)

| | डिसेंबर १९५० | डिसेंबर १९५१ | डिसेंबर १९५२ |
|---|---|---|---|
| रशिआ सोडून इतर जग | ३५८२० | ३५९५० | ३६२१० |
| अर्जेंटायना | २१६ | २६८ | २६८ |
| बेल्जम | ५८७ | ६२१ | ७१८ |
| ब्राझिल | ३१७ | ३१७ | ३१७ |
| कॅनडा | ५९० | ८५० | ८९२ |
| क्यूबा | २७१ | ३११ | ३१८ |
| फ्रान्स | ५२३ | ५४८ | ५५८ |
| भारत | २४७ | २४७ | २४७ |
| इटली | २५६ | ३३३ | ३३६ |
| जाव्हा | २०८ | २७९ | २०० |
| मेक्सिको | २०८ | २०८ | ७० |
| नेदरलँडस् | ३११ | ३१६ | ३२६ |
| पोर्तुगाल | १९२ | ५६५ | २७७ |
| स्वीडन | ९० | १५२ | २०२ |
| स्वित्झरलँड | १४७० | १४५२ | १४०४ |
| युनायटेड किंग्डम | ३३०० | २३३५ | १६८५ |
| युरवे | २३६ | २२१ | २११ |
| व्हेनेझुएला | ३७३ | ३७३ | ३७३ |
| आय. एम. एफ. | १४९५ | १५३७ | १६८१ |
| बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंटस् | १६७ | ११५ | १८३ |
| अमेरिका (युनायटेड स्टेटस्) | २२७९५ | २३६२१ | २३२४३ |

निरनिराळ्या देशांनीं आपआपल्या देशांच्या चलनाला तारण म्हणून जो सोन्याचा सांठा ठेवलेला असतो त्याच्या हालचालींचे हे आकडे आहेत.

**सागर विद्यापीठाला मदत**—भारतीय सरकार सागर विद्यापीठाला २,७०,००० रुपयांची मदत करणार आहे, असें समजतें. ह्यापैकीं १,००,००० रुपये आर्टस् अभ्यासक्रमाच्या वाचनालयासाठीं, ४०,००० रुपये मानव-वंश शास्त्राच्या अध्यापनासाठीं, ५,००० रुपये विद्यापीठाच्या नियतकालिकासाठीं आणि उरलेले शास्त्र-शाखेच्या उपकरणासाठीं देण्यांत येणार आहेत.

**रशिआची नवी आगगाडी**—ता. १५ मे पासून रिगा ते मॉस्कोपर्यंत एक नवीन एक्सप्रेस गाडी रशिअन रेल्वे सोडणार आहे. ह्या गाडींतील टेबलावरील दिव्यांतच रेडिओ सेट्स बसविण्यांत आले आहेत असें समजतें. पडदे रेशमाचे करण्यांत आले असून गाडींत सर्वत्र गालिचा टाकलेला आहे.

### राजधानींत अंड्यांत करण्यांत येणारी भेसळ

दिल्ली येथें कोंबडीचीं अंडीं विकणारे दुकानदार मालांत भेसळ करून विकतात असें आढळून आलें आहे. शहरांत रोज सुमारें ४०,००० कासवांचीं अंडीं विकण्यांत येतात. अर्थात् कोंबडीच्या खऱ्या अंड्यांत त्यांची भेसळ करण्यांत येते. अंड्यांना असणारी मागणी व त्यांचा पुरवठा ह्यांच्यांत खूपच अंतर असल्यानें गेलीं तीनचार वर्षें हा प्रकार चालला आहे. कासवांचीं अंडीं हीं आकारानें आणि वजनानें जवळ जवळ कोंबडीच्या अंड्यांच्याच आकाराचीं असल्यानें भेसळ उघडकीस येणें कठीण गेलें. कारण दोन्ही प्रकारचीं अंडीं नुसतीं शेजारीं ठेवल्यास त्यांच्यांतील फरक कळणें दुरापास्तच असतें. त्यामुळें प्रयोगशाळेंत त्यांची परीक्षा करणें एवढाच एक मार्ग शिल्लक रहातो. यमुनेच्या पात्रांत हीं अंडीं खूप मोठ्या संख्येनें सांपडतात आणि तीं शोधून काढण्यासाठीं फारसा खर्च आणि प्रयत्नाहि करावा लागत नाहीं. अर्थातच व्यापाऱ्यांनी ह्या गोष्टीचा चांगलाच फायदा घेतला. दिल्लीमधील हॉटेलामधून कासवाच्या अंड्यांचे खाद्यपदार्थ सरसहा विकले जात आहेत. हा प्रकार थांबविण्यासाठीं दिल्ली राज्य सरकारनें मध्यवर्ती सरकारला भेसळ प्रतिबंधक कायद्यांत दुरुस्ती करण्याविषयीं सुचविलें होतें. अशी दुरुस्ती केल्याशिवाय भेसळ करणाऱ्यांना कायद्याच्या कक्षेंत आणतां येत नाहीं. खाद्यपदार्थ ह्या दृष्टीनें हीं अंडीं कोंबडीच्या अंड्यापेक्षा कोणत्या रीतीनें भिन्न आहेत हें पहाण्यासाठीं त्यांची रासायनिक परीक्षा सध्या चालू आहे. पौष्टिक खाद्यपदार्थ म्हणून तीं कोंबडीच्या अंड्यांच्या बरोबरीचीं ठरलीं तर यमुनेचें पात्र म्हणजे दिल्लीच्या नागरिकांची नवीन कोठीच होईल. पण रासायनिक निर्णय उलट गेल्यास कायद्याची दुरुस्ती करावीच लागेल.


## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्लें, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिक्कोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | १,९०,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९२,९३,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट लौकरच सुरू होत आहे.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एम्. जी. हेरेकर, चेअरमन. ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर. एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

## मध्यवर्ती सरकारचें समाधानकारक अंदाजपत्रक

(मा. म. काळे)

अर्थमंत्री श्री. देशमुख यांनीं १९५३–५४ चें लोकसभेला सादर केलेलें अंदाजपत्रक अनेक दृष्टींनीं उत्साहजनक आहे. हें अंदाजपत्रक पाहून कारखानदार व व्यापारीवर्ग संतुष्ट झाला आहे व प्राप्तीकराची अंमलबजावणी सध्यांच्या रु. ३६००: च्या ऐवजीं रु. ४२००: वार्षिक उत्पन्नावर होणार असल्यामुळें खालच्या श्रेणींतील मध्यमवर्गीय जनतेलाहि जरासें बरें वाटलें आहे. सुपारीच्या आयातीवरील कर पौंडाला दोन आण्यांनीं वाढणार व पोस्टल रजिस्ट्रेशन, इन्शुरन्स, बुक-पोस्ट इ. दरांत-वाढ होणार ही गोष्ट किंचित् असमाधान निर्माण करील. परंतु सर्व ठिकाणच्या शेअरमार्केटवर अंदाजपत्रकाची प्रतिक्रिया समाधानकारक झाली असून, तागावरील निर्यात जकात रु. १७५ पासून रु. ८० करण्यांत आल्यामुळें व कांहीं उद्योगधंद्यांत जें व्याज पुन्हां भांडवलाच्या रूपानें गुंतविलें जाईल त्याची कॉर्पोरेशन टॅक्स पासून मुक्तता व इतर कोणताहि नवीन कर नसणें या गोष्टींमुळें कारखानदार व व्यापारीवर्गहि संतुष्ट आहे.

यंदाच्या अंदाजपत्रकाबद्दल थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, लियाकत अलीच्या अंदाजपत्रकानें भांडवलदार व व्यापारीवर्गाला दिलेला धक्का आतां पूर्ण नष्ट झाला असून आशाजनक विश्वासाचें नवीन वातावरण निर्माण करण्यांत आलें आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर फाळणीमुळें उद्भवलेल्या निर्वासितांच्या व इतर प्रश्नांना तोंड द्यावें लागल्यामुळें खर्च वाढला. १९५० नंतर कोरियन प्रकरणाचा परिणाम दिसून आला.

मध्यंतरीं तीव्र अन्नटंचाईला तोंड द्यावें लागल्यामुळें परराष्ट्रीय व्यापारांत तूट येऊं लागली. डॉलरची टंचाई, रुपयाचें अवमूल्यन, हेहि प्रश्न आपणाला सोडवावे लागले. याच धामधुमीच्या काळांत पंचवार्षिक योजना १९५१ च्या मध्यानंतर प्रथम पुढें आली व आतां या योजनेचा दुरुस्त आराखडा प्रसिद्ध होऊन योजनेची अंमलबजावणी वेगानें होऊं लागली आहे. ३८ कोटी रुपये खर्चाच्या तीन वर्षांत पूर्ण करावयाच्या ५५ ग्रामविकासयोजना हा एक नवीन वास्तववादी दीड कोटी खेडुतांच्या जीवनाला अभिनव वळण लावणारा कार्यक्रम आहे. या दृष्टीनें अंदाजपत्रकावर पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी आली आहे. गेले कांहीं दिवस ऐकूं येत असलेली तुटीच्या अंदाजपत्रकाची कल्पना यंदा सादर करण्यांत आलेल्या अर्थसंकल्पांत स्पष्टपणें दिसते व भांडवली खर्च हिशेबांत धरून रु. १४० कोटी तूट येणार असल्यामुळें कांहीं खर्च नोटा छापून भागविला जाईल. नोटा प्रसृत करण्यापूर्वी रोकड शिलकींतून रु. ३० कोटींची उचल, ट्रेझरी बिलांची विक्री, बचतीच्या योजना व कर्जउभारणी या गोष्टींचा अवलंब केला जाईलच. परंतु जरूर तेव्हां नोटा प्रसृत करून खर्चाची तरतूद करणें या गोष्टींचा प्रथमच अवलंब करण्यांत येणार आहे व तो पुढील दोन वर्षांतहि जरूरीप्रमाणें केला जाईल. गेल्या एका वर्षांत सर्वसाधारण किंमती सुमारें ५७ टक्क्यांनीं उतरल्या असून त्या आतां स्थिर होण्याच्या मार्गावर आहेत, तेव्हां आतांचा काळ नोटा प्रसृत करून खर्च भागविण्याच्या दृष्टीनें अनुकूल आहे अशी विचारसरणी आहे. याच्या जोडीला गेल्या वर्षांत औद्योगिक उत्पादन व शेतीचें उत्पादन वाढत चाललें आहे व ब्रॉयलर्स, पॉवर प्रेसेस, औषधें इ. कांहीं नवीन धंदेहि सुरू झाले आहेत. बेकारी सुरू झालेली आहे, परंतु पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीमुळें कांहीं नव्या नोकऱ्या निर्माण होतील. मजुरीचे दर उतरतां कामा नयेत ही काळजी घेतली पाहिजे. या गोष्टीकडे व इतर आनुषंगिक गोष्टींकडे नोटा प्रसृत करण्याचें धोरण स्वीकारतांना सरकार काळजीपूर्वक लक्ष देईल असें आश्वासन अर्थमंत्र्यांनीं दिलें आहे. करविषयक प्रश्नांची बारकाईनें चौकशी करण्यासाठी डॉ. जॉन मथाई यांच्या अध्यक्षतेखालीं चौकशी-कमिटी नेमण्याचें ठरलें असून तिचें काम एप्रिलमध्यें सुरू होईल.

सुधारलेलें औद्योगिक व शेतीचें उत्पादन, स्थिरावत जाणाऱ्या किंमती, परराष्ट्रीय व्यापारांत सुधारणा व स्टर्लिंग शिलकींत रु. ३० कोटींनीं वाढ या गोष्टींच्या पार्श्वभूमीवर अंदाजपत्रकाची उभारणी करण्यांत आली आहे. बहुतेक सर्वांनाच संतुष्ट करणाऱ्या या अंदाजपत्रकाबद्दल इस्टेट ड्यूटीच्या प्रश्नाचा विचार कां केलेला नाहीं असा आक्षेप क्वचित ऐकूं येतो. परंतु इस्टेट ड्यूटी लादली तरी तिचें उत्पन्न अगदींच थोडें येणार आहे हें निश्चित. लष्करी खर्चांत आजच्या परिस्थितींत कपात करतां येणार नाहीं, हें स्पष्टपणें सांगण्यांत आलें आहे. अन्नविषयक मदत व साखर-कारखानदारांना दिलेली नुकसानभरपाई या दोन गोष्टींवर पुढील वर्षी खर्च होणार नाहीं व त्यामुळें रु. २५ कोटींची बचत होईल.

मूळच्या अंदाजाप्रमाणें १९५२–५३ चें उत्पन्न रु. ४०४ कोटी ९८ लक्ष व खर्च रु. ४०१ कोटी २५ लक्ष येऊन रु. ३ कोटी ७३ लक्ष शिल्लक उरणार होती. परंतु आतां दुरुस्त अंदाजाप्रमाणें उत्पन्न रु. ४१८ कोटी ६४ लक्ष, खर्च रु. ४२२ कोटी ४३ लक्ष होणार असून तूट रु. ३ कोटी ७९ लक्षांची येणार आहे. भांडवली खर्च हिशेबांत धरून एकूण तूट १९५२–५३ साली रु. ७५ कोटी ६० लक्ष होईल असा अंदाज होता, परंतु दुरुस्त अंदाजाप्रमाणें एकूण तूट रु. ८३ कोटी येणार आहे. १९५३–५४ वर्षी सध्यांप्रमाणेंच कर-योजना चालू राहिली तर उत्पन्न रु. ४३७ कोटी ७६ लक्ष येईल, परंतु अंदाजपत्रकांत कांहीं कर कमी करून इतर किरकोळ वाढविले आहेत त्यामुळें पुढील वर्षी नव्या करयोजनेप्रमाणें उत्पन्न रु. ४३९ कोटी २६ लक्ष येणार असून खर्चाचा अंदाज रु. ४३८ कोटी ८१ लक्षांचा असल्यामुळें शिल्लक रु. ४५ लक्ष उरेल. परंतु १९५३–५४ मधील भांडवली खर्च हिशेबांत घेतला तर एकूण तूट रु. १४० कोटींची येईल. पुढील वर्षी लष्करी खर्च रु. १९९ कोटी ८४ लक्ष होणार असून इतर मुलकी खर्च रु. २३८ कोटी ९७ लक्ष होईल, असा अंदाज आहे.

---

### फिनॅन्स बिलांतील कांहीं तरतुदी

हिंदु अविभक्त कुटुंबाचें ७,२०० रु. पर्यंतचें उत्पन्न प्राप्तीकरास पात्र नव्हतें; ही मर्यादा ८,४०० रु. पर्यंत वाढविण्यांत येत आहे. वैयक्तिक करमाफ उत्पन्नाची मर्यादा ३,६०० रु. वरून ४२,०० रु. वर नेण्यांत येईल.

पोस्टाच्या दरांत केलेली वाढ पुढीलप्रमाणें आहे:—

| | चालू दर | नवा दर |
|---|---|---|
| पार्सल | ४० तोळ्यांस ६ आणे | ४० तोळ्यांस ८ आणे |
| बुकपोस्ट इ. | पहिल्या पांच तोळ्यांस ९ पै. पुढील प्रत्येक अडीच तोळ्यांस ३ पै | पहिल्या पांच तोळ्यांस १ आणा. पुढील प्रत्येक अडीच तोळ्यांस ६ पै |
| रजिस्ट्रेशन फी | ४½ आणे | ६ आणे |
| इन्शुअरन्स (१० रु.) | ४ आणे | ६ आणे |
| ,, (पुढील प्रत्येक १००) | २ आणे | ४ आणे |

## भारत सरकारचें अंदाजपत्रक

**उत्पन्न**

| | अंदाज १९५२–५३ | दुरुस्त अंदाज १९५२–५३ | अंदाज १९५३–५४ |
|---|---|---|---|
| कस्टम्स | १,६५,०० | १,७७,०० | १,७०,०० |
| एक्साइज | ८६,०० | ८०,०० | ९४,०० |
| कॉर्पोरेशन कर | ३०,५३ | ३९,८३ | ३६,६२ |
| प्राप्तीवरील इतर कर | ७३,६३ | ७३,३५ | ६८,४८ |
| अफू | २,२० | १,९५ | २,०० |
| व्याज | २,३३ | २,५० | ३,०५ |
| कारभार | ८,९० | ११,७४ | ११,१८ |
| चलन, टांकसाळ | १०,३९ | १०,७७ | १५,९ |
| सिव्हिल वर्क्स | १,५१ | १,४७ | १,५३ |
| इतर | ६,३५ | १०,४८ | ८.९ |
| पोस्ट–तार | १,१६ | १,४० | ४० |
| रेल्वेज | ७,६५ | ७,६८ | ७,६५ |
| विशेष बाबी | ९,३३ | ४७ | १८,४७ |
| एकूण उत्पन्न | ४,०४,९८ | ४,१८,६४ | ४,३७,७६ |

**खर्च**

| | | | |
|---|---|---|---|
| उत्पन्नावर अग्रहक्कांचे खर्च | १५,७६ | ३१,०५ | ३२,४९ |
| इरिगेशन | १८ | १७ | १९ |
| कर्जविषयक | ३६,१६ | ३५,०३ | ३७,१७ |
| कारभार | ५५,९८ | ५६,२३ | ७१,२७ |
| चलन टांकसाळ | ३,२० | ३,०४ | २,५७ |
| सिव्हिल वर्क्स | १४,९६ | १४,८२ | १५,०६ |
| पेन्शनें | ७,९५ | ८,०७ | ८,३६ |
| निर्वासितांसाठी | १०,०९ | ११,३२ | १२,६७ |
| अन्नधान्य सबसिडी | १५,०० | २१,११ | — |
| इतर खर्च | ७,८८ | १२,६१ | ८,३४ |
| राज्यांना ग्रँटस् | २०,२८ | २३,०४ | २६,३७ |
| विशेष बाबी | १५,८६ | १३,२१ | २४,४८ |
| लष्करी खर्च | १,९७,९५ | १,९२,७३ | १,९९,८४ |
| एकूण खर्च | ४,०१,२५ | ४,२२,४३ | ४,३८,८१ |
| | (+) ३,७३ | (—) ३,९७ | (+) ४५ |

**सारांश**

( नवी करवाढ लक्षांत घेऊन )

आंकडे लक्ष रुपयाचे

| | १९५२–५३ दुरुस्त | १९५३–५४ अंदाज |
|---|---|---|
| उत्पन्न | ४,१८,६४ | ४,३९,२६ |
| खर्च | ४,२२,४३ | ४,३८,८१ |
| | (—) ३,७९ | (+) ४५ |

**जग किती लहान आहे**—२ एप्रिलपासून ब्रिटिश एअरवेज कॉर्पोरेशन लंडन ते टोकिओ हा प्रवास कॉमेट विमानाच्या साह्यानें करणार आहे. ह्या दोन शहरांतील अंतर १०,००० मैल आहे. येवढें अंतर कापण्यास कॉमेट विमानाला अवघे ३३॥ तास लागतील असा अंदाज आहे. हा प्रवास प्रथम दर आठवड्यांतून एकदा व नंतर दोनदा करण्यांत येईल.

## भारत इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें

**३१–१२–५२ रोजींचा संक्षिप्त ताळेबंद**

| देणें | रु. | जिंदगी | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ४,००,१५५ | कॅश, रिझर्व्ह, इं. बँकेंत | ५,२२,६९९ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ७५,५०० | इन्व्हेस्टमेंट्स | २२,१०,००० |
| ठेवी | ४६,७०,६५५ | ॲडव्हायन्सेस | २५,३५,०४७ |
| १९५२ चा नफा | २०,७८० | इमारत | १,२२,३०२ |
| रु. | ५८,९३,६८८ | रु. | ५८,९३,६८८ |

**३१–१२–५२ चें संक्षिप्त नफातोटापत्रक**

| खर्च | रु. | जमा | रु. |
|---|---|---|---|
| दिलेलें व्याज | १,२८,२४२ | व्याज व डिस्कौंट | २,६४,७१४ |
| पगार, भत्ते | ९१,१९७ | कमिशन, हुंडणावळ | १०,६७६ |
| नफा (१९५२ चा) | २०,७८० | इतर | ६,०२० |
| रु. | २,८१,८७६ | रु. | २,८१,८७६ |

**नफ्याचा विनियोग**

| | रु. |
|---|---|
| १७ व्या कलमाप्रमाणें रिझर्व्ह फंड | ६,००० |
| ६% क्यु. प्रेफरन्स डिव्हिडंड | १,६२३ |
| इन्व्हेस्टमेंट डिप्रिसिएशन फंड | १,५०० |
| कॉन्टिन्जन्सी फंड | १,००० |
| शिल्लक नफा पुढील वर्षासाठी ( यांतून कर द्यावयाचा ) | १०,०३५ |

## NOTICE

**THE BHARAT INDUSTRIAL BANK, Ltd., POONA.**

Notice is hereby given that the 15th Ordinary General Meeting of the Shareholders of the Bharat Industrial Bank Ltd., Poona, will be held on Saturday the 14th March, 1953, at the Registered Office of the Bank, 15, Shukrawar Peth, Poona, at 4 p. m. to transact the following business :

1. To receive and consider the Report of the Directors. Audited Balance sheet and Profit and Loss Account for the period ending 31st December, 1952.
2. To declare dividend on 6% C. R. P. Shares.
3. To elect Directors in places of the retiring Directors who are eligible for re-election.
4. To appoint Auditors and fix up their remuneration.
5. To transact such other business as may be allowed by the Chairman.

By order of the Board.

**N. N. Kshirsagar,**
**R. B. Salvekar**
Managing Directors

Poona, 16th Feb. 1953.
15, Shukrawar Peth, Poona 2.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.